आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार  दिनांक ०८ जानेवारी २०२५

ठळक बातम्या

1. रस्ते अपघातातल्या जखमींसाठी दीड लाखापर्यंतचे उपचार रोखमुक्त करण्याच्या योजनेला सुरुवात; हिट अँड रनमधल्या मृतांच्या वारसांना २ लाख रुपयांची आर्थिक मदत.
2. मराठी आणि प्राकृतला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पात्र असलेले लाभ देण्याची राज्याची केंद्र सरकारकडे मागणी.
3. रेल्वे पुनर्विकास योजनेअंतर्गत नागपूर आणि अजनी रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास येत्या 1 ते सव्वा वर्षात पूर्ण होणार : नागपूर मध्य रेल्वेचे व्यवस्थापक विनायक गर्ग यांची माहिती.
4. 31 व्या ऑरेंज सिटी क्राफ्ट मेळ्याचं येत्या 10 ते 19 जानेवारी दरम्यान नागपूरच्या दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्रात आयोजन.
5. दोन नक्षल महिलांचे गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण.

-------------------------------------

नितीन गडकरी

केंद्रीय रस्ते वाहतूक  मंत्री नितीन गडकरी यांनी देशभरात चालक प्रशिक्षण  संस्था स्थापन करण्याविषयीची योजना जाहीर केली असून अशा संस्था उभारण्यासाठी सरकार प्रोत्साहन देणार आहे. ते काल बातमीदारांशी नवी दिल्ली येथे  बोलत होते. देशात कुशल चालकांची वानवा असून चालक प्रशिक्षण संस्था उभारण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं. सगळी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाच्या वाहतूक मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत रस्ता सुरक्षेला अत्युच्च प्राधान्य देण्यात आलं, असंही ते म्हणाले.-

*हमारे देश में २२ लाख  ड्रायव्हर्स की कमी है  और उसके ऊपर भी आज हमने  एक नयी पॉलिसी बनाई है कैशलेस ट्रीटमेंट । और एक्सीडेंट होने के बाद तुरंत  २४ घंटे के अंदर जैसे पुलिस में इनफार्मेशन जाएगी तो डॉक्टर जो होगा उसको जो पेशंट्स एडमिट होगा उसको ७ दिन तक ट्रीटमेंट का खर्चा या मैक्सिमम अप टू १,५०,००० रुपये  का खर्चा हम तुरंत देंगे उसके ट्रीटमेंट के लिए ।*

रस्ते आणि वाहतूक क्षेत्रात बदल घडवून आणण्याच्या उद्देशानं सर्व प्रकारच्या अडचणी, त्यावरचे उपाय यावर चर्चा झाल्याचं सांगितलं. स्वयंचलित तपासणी

केंद्रांच्या उभारणीसाठी देखील सरकार जादा प्रोत्साहन देणार आहे. अशी माहिती गडकरी यांनी दिली.

------------------------------------

**अभिजात भाषेचा दर्जा**

मराठी आणि प्राकृतला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासोबतच मिळणारे इतर लाभ देण्याची विनंती राज्य सरकारनं आज केंद्राला केली. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांची भेट घेतली. त्यावेळी यासंदर्भात ४ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्राची प्रत शेखावत यांनी सामंत यांना सुपूर्द केली. मराठी, पाली, प्राकृत, आसामी आणि बांग्ला या भाषांना अभिजात दर्जा दिल्याचा उल्लेख त्यात आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक प्रस्ताव २-३ आठवड्यात सादर करू, असं सामंत म्हणाले.

*मला असं वाटत आहे की आता आमची जबाबदारी वाढलेली आहे आणि या जबाबदारीमध्ये काम करून मराठी भाषेचं जतन आणि संवर्धन हे महाराष्ट्रामध्येच नाही तर आंतराष्ट्रीय पातळीवर कशा पद्धतीने केले जाईल, यासाठी आम्ही -------- पाठपुरावा करतोय .*

महाराष्ट्रासह इतर राज्यात तसंच विदेशातही मराठी भाषेचं जतन संवर्धन करण्यासाठी विविध प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती राज्य सरकारनं नियुक्त केलेल्या समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मुळे यांनी दिली.

------------------------------------

**शैक्षणिक साहित्य संमेलन**

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर 'मराठी ज्ञानभाषा व्हावी' ही जिद्द मनाशी बाळगून 'आम्ही मराठी' ही चळवळ सुरू करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने, नागपुरातील नूतन भारत विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, विदर्भ साहित्य संघ, नागपूर महानगरपालिका शिक्षण विभाग, कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 12 ते 14 जानेवारी 2025 या कालावधीत राज्यस्तरीय मराठी भाषाप्रेमी शैक्षणिक साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे.कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे रविवार, दि.12 जानेवारी रोजी सायं. 6 वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते संमेलनाचं उद्घाटन होणार असून मराठी सिने कलावंत अंकुश चौधरी यांची यावेळी विशेष उपस्थिती राहणार आहे. संमेलनाचे अध्यक्षपद अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे भूषविणार असून स्वागताध्यक्ष विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते हे राहतील.

-----------------------------------------

मध्य रेल्वे  व्यवस्थापक पत्र परिषद

नागपूर येथील मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर घेतलेल्या पहिल्या पत्रकार परिषदेमध्ये मध्य  रेल्वेच्या नागपूर विभागाचं संपूर्ण देशभरात असलेलं महत्त्व अधोरेखित करतांना  सांगितलं की त्यांची प्राथमिकता ही रेल्वे  प्रवाशांची सुरक्षितता आणि त्यांचा आरामदायक प्रवास असणार आहे.

*नागपुर मंडल न केवल मध्य रेलवे का पूरे भारतीय रेल का सबसे बहुत महत्वपूर्ण मंडल है। इसमें हम लोग नागपूर से पश्चिम और उत्तर से दक्षिण की सभी गाड़ियों का संचालन या से होगा । लगभग सवा सौ के आसपास ट्रेने यहां से गुजरती है, और पूरे हिंदुस्तान में सबसे ज्यादा वेल कनेक्टेड नागपूर ये स्टेशन आता है। मेरी पहली प्राथमिकता रहेंगी कि जीतने भी मेरे पैसेंजर्स हैं, उनकी सेफ्टी, सिक्योरिटी और उनकी जो अमेनिटीज़ हैं उसपे मैं विशेषकर ध्यान दूँ। अमृत भारत के अंदर 15 स्टेशन्स का विकास कार्य हो रहा है जो हम लोग लगभग 1 साल में पूरा कर लेंगे। इसके अलावा दो बड़े स्टेशन नागपुर और अजनी का री-डेवलपमेंट हो रहा है। अजनी को 1 साल के अंदर और नागपुर को भी अगले 1 साल से  सवा साल के अंदर पूरा करने का प्लान किया है।*

याप्रसंगी बोलताना  वाणिज्य विभागाचे व्यवस्थापक अमन मित्तल यांनी गेल्या वर्षात मध्य रेल्वेने राबवलेल्या उपक्रमाविषयी माहिती दिली. यात त्यांनी नागपूर स्टेशनवर लावलेल्या मार्गदर्शक किओस्क तसेच वेंडर  मॅनेजमेंट सिस्टीमबद्दल माहिती दिली. प्रवासी तसेच मालवाहू रेल्वे गाड्यासोबतच मध्य रेल्वेनं धम्मचक्र प्रवर्तन दिन, दिवाळी, छटपूजा, ताजुद्दीन बाबा ऊर्स, महापरिनिर्वाण दिन तसेच कुंभमेळ्यासाठी अतिरिक्त रेल्वे गाड्या चालवल्या असल्याची माहिती त्यांनी दिली.

-----------------------------------------

खनिकर्म विभाग

खनिकर्म विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना आणि  उपक्रमांची अंमलबजावणी प्रभावीपणे करून सर्व कामकाजामध्ये सुसूत्रता आणणार असल्याचे खनिकर्म मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले, तसेच खनिकर्म विभागातील सुरू असलेल्या कामांचा आढावा त्यांनी मुंबईत घेतला. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली खनिकर्म विभागाची आढावा बैठक मंत्रालयात झाली, याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

-----------------------------------------

**ऑरेंज सिटी क्राफ्ट मेळा**

केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या अखत्यारीतील नागपूरच्या सिव्हिल लाईन इथल्या दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राद्वारे दरवर्षी आयोजित केला जाणारा 'ऑरेंज सिटी क्राफ्ट मेळा आणि लोकनृत्य सोहळा' येत्या 10 ते 19 जानेवारी दरम्यान आयोजित केला जाणार असून या मेळाव्याचं हे 31 वं वर्ष असल्याचं या केंद्राच्या संचालिका आस्था कार्लेकर यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये सांगितलं. या दहा दिवसीय मेळ्यामध्ये विविध राज्यांची लोकनृत्यं, हस्तशिल्पप्रदर्शन त्याचप्रमाणे व्यंजनांची दालनं राहणार आहेत. मेळाव्याचं उद्घाटन 10 जानेवारी रोजी संध्याकाळी साडे सहा वाजता होणार असून दुपारी 2 ते रात्री साडे नऊपर्यंत या मेळाव्यामध्ये नागरिकांना सशुल्क प्रवेश करता येईल. मंगळवार दि. 14 जानेवारी रोजी संध्याकाळी साडे सहा वाजता राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'महाराष्ट्राची लोकधारा' हा महाराष्ट्राची लोकनृत्यं तसेच लोककलांचं सादरीकरण करणारा कार्यक्रम प्रस्तुत केला जाईल, या मेळाव्यामध्ये रोजच संध्याकाळी साडेसहा वाजता विविध राज्यांच्या संस्कृतीचं दर्शन घडवणारी लोकनृत्यं, संगीत यांचे सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून या मेळाव्यात दोनशेहून अधिक लोकनृत्य आणि आदिवासी कलाकार तसेच दीडशे हस्तशिल्पकार सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाला तसेच प्रदर्शनाला भेट देण्याचं आवाहन कार्लेकर यांनी केलं आहे.

*शिल्पी आणि कारीगर यांच्याकडनं तयार झालेल्या गोष्टी तुम्हाला विकतही घेता येणार त्यामुळे आनंदाने क्राफ्ट मेला सांस्कृतिक कार्यक्रमासोबत सुमधुर आणि सुस्वाद असलेल अस व्यंजन खात खात तुम्हाला एन्जॉय करायला मिळेल. नागपूरकरांना असाच आव्हान देईल की भरपूर आत्तापर्यंत जेव्हड प्रेम केलं तसंच भरभरून प्रेम करा. जरूर या आणि हा क्राफ्ट मेला अजून मोठा उंच घेऊन जावा.*

---

**दोन नक्षल आत्मसमर्पण**

सुमारे १० लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या कंपनी क्रमांक १० ची सेक्शन कमांडर आणि भामरागड दलमच्या सदस्य असलेल्या नक्षल महिलांनी आज गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. ३६ वर्षीय शामला उर्फ लीला झुरु पुडो आणि २४ वर्षीय काजल उर्फ तिम्मी मंगरु वड्डे अशी आत्मसमर्पण केलेल्या नक्षलींची नावं आहेत.शामला पुडो ही एटापल्ली तालुक्यातील गट्टेपल्ली येथील रहिवासी असून, सध्या कंपनी क्रमांक १० ची सेक्शन कमांडर होती. तिच्यावर २१ चकमकी, ६

जाळपोळ आणि इतर १८ अशा एकूण ४५ गुन्ह्यांची नोंद आहे. शासनाने तिच्यावर ८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.काजल वड्डे ही भामरागड तालुक्यातील नेलगुंडा येथील रहिवासी आहे. ती २०१८ पासून भामरागड दलममध्ये कार्यरत होती. तिच्यावर ४ चकमकी, १ जाळपोळ आणि इतर ३ अशा एकूण ८ गुन्ह्यांची नोद आहे. शासनाने तिच्यावर दोन लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

-------------------------------------------

नागपूर फिल्म फेस्टिवल

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि चलचित्र फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'नागपूर फिल्म फेस्टिवल'चे आयोजन करण्यात आले आहे. हा चार दिवसीय महोत्सव येत्या 9 जानेवारी ते 12 जानेवारी या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनात पार पडणार आहे.महोत्सवाचे उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे आणि नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांच्या हस्ते 12 जानेवारी 2025 रोजी होणार आहे.

-------------------------------------------

हवामान

विदर्भात थंडीचा कडाका कायम असून आज सकाळी नागपुरात बोचरे वारे अनुभवायला मिळाले. आज विदर्भात सर्वाधिक किमान तापमानाची नोंद यवतमाळ जिल्ह्यात नऊ अंश सेल्सिअस इतकी करण्यात आली. यवतमाळ पाठोपाठ गोंदिया येथे नऊ पूर्णांक चार, तर अमरावती इथं नऊ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. तर नागपूर इथं दहा पूर्णांक दोन अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदवण्यात आलं. उर्वरित सर्व जिल्ह्यात तापमान 11 ते 13 अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

-------------------------------------------